नक्षलविरोधी अभियानाकरीता खरेदी करण्यात आलेल्या हेलिकॉप्टरसाठी एअरबस या कंपनीला निधी वितरीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.बीयुडी १६१९/प्र.क्र.४०/२८-अ
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१९.

वाचा:- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. १.४.२०१९.
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि, क्र.बीयुडी-२०१९/प्र.क्र.९६/२०११/२५, दि .१/४/२०१९
३) शासन समक्रमांक निर्णय दि.१६ मे २०१९

प्रस्तावना :-

मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ च्या बैठकीमध्ये नक्षलविरोधी अभियानाकरीता नवीन हेलिकॉप्टर खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.त्याअनुषंगाने दिनांक ८/५/२०१८ रोजी राज्य शासनाने नक्षलविरोधी अभियानाकरीता एकूण यु.एस.डॉलर १,०३,४७,००० म्हणजेच अंदाजे रु.७२.४३ कोटी इतक्या किंमतीचे एच १४५ हे हेलिकॉप्टर खरेदीबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.हेलिकॉप्टर खरेदीचा आवश्यक खर्च मागणी क्र.-४ "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) शासनाचे विमानचालन विषयक सल्लागार" अंतर्गत "५२-यंत्रसामुग्री व साधनसामग्री" या उद्दिष्टमधून भागविण्यात येतो. सदर खरेदी प्रक्रियेसाठी आतापर्यंत दोन टप्प्यात एकूण यु.एस.डॉलर रु.५१,७३,५००/ म्हणजेच अंदाजे रु.३५.९४ कोटी (प्रचलीत दरानुसार) निधी एअरबस कंपनीला अदा करण्यात आलेला आहे. तथापि, जून,२०१९ मध्ये Technical/Flight Acceptance ची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असल्यामुळे कराराप्रमाणे उर्वरित ५० टक्के पैकी ४८ टक्के रक्कम यु.एस.डॉलर ४९,६६,५६०/- म्हणजेच अंदाजे रक्कम रु.३४,५२,२५,५८६/- (आजच्या प्रचलित दरानुसार) अदा करावी लागणार आहे.

२. तथापि, दिनांक १६/५/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी एप्रिल, २०१९ ते जून, २०१९ या तिमाहीसाठी ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री या उद्दिष्टासाठी रु.५२,४४,७५,०००/- पैकी रु.२३,७०,५६,०००/- इतकी तरतूद विमानचालन संचालनालयाला वितरीत करण्यात आली आहे. त्यामुळे, अदा करावयाच्या यु.एस.डॉलर ४९,६६,५६०/- म्हणजेच अंदाजे रक्कम रु.३४,५२,२५,५८६/- (आजच्या प्रचलित दरानुसार) पैकी उपलब्ध तरतुदीतून रु.२३,००,००,०००/- इतकी रक्कम एअरबस कंपनीला अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"मागणी क्र.ए-४, लेखाशिर्ष २०७० इतर प्रशासनिक सेवा (००) (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमानचालन सल्लागार महाराष्ट्र शासन (२०७० ०१५६)" खाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध लेखानुदापैकी प्रथम तिमाहीकरीता म्हणजेच माहे एप्रिल २०१९ ते माहे जून २०१९ करीता विमानचालन संचालनालयास ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री या उद्दिष्टासाठी एकूण रू.२३,७०,५६,०००/- (अक्षरी रू. तेवीस कोटी सत्तर लाख छप्पन हजार फक्त) इतके लेखाअनुदान वितरीत करण्यात आले आहे.

२. ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री या उद्दिष्टाखाली विमानचालन संचालनालयास वितरीत करण्यात आलेल्या लेखानुदानाच्या रू.२३,७०,५६,०००/- (अक्षरी रू. तेवीस कोटी सत्तर लाख छप्पन हजार फक्त) या तरतुदीतून एअरबस कंपनीच्या एच १४५ या हेलिकॉप्टरसाठी या कंपनीला अदा करावयाच्या ४८ टक्के रकमेपैकी रु.२३,००,००,०००/- इतकी रक्कम एअरबस कंपनीला उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर खर्च विवक्षीत बाबींवरच खर्च करण्यात यावा.तसेच, याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक १/४/२०१९ च्या परिपत्रकातील संबधित अटींचे पालन करण्यात यावे.

४. सदर खर्चासाठी उप संचालक विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०६२५१४३९४७९८०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e6456454566613634 00c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.06.25 14:49:09 +05'30'

(भ.बु.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक/ उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई.
६. निवडनस्ती.